Vivekanand Shikshan Sanstha's

**Vivekanand Arts, Sardar Dalipsingh Commerce & Science College**

Samarthnagar, Aurangabad.

Date :

# PRESS RELEASE

## विवेकानंद महाविद्यालयाचे राज्यस्तरीय व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेमध्ये यश

क्रीडा भारती पुणे तर्फे आयोजित शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या राज्यस्तरीय व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालयाच्या शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी आपल्या लौकिकास साजेसा खेळ करून स्पर्धेमध्ये वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी करत उपविजेतेपद मिळवले. संपन्न झालेल्या स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालयाच्या शिक्षक व शिक्षकेत्तर संघाने चव्हाण हायस्कूल, पुणे या संघाचा २५ -२०, २५-१२ असा पराभव केला तर उपांत्यपूर्व फेरी मध्ये ऑर्चीड स्कूल, पुणे या संघाचा (२५-०९, २५-०८) अशा गुणांनी पराभव केला तर उपांत्य फेरीमध्येभावे स्कूल, पुणे या संघाचा (२५-२३, २५-२१) अशा गुणांनी पराभव करत उपविजेतेपद मिळवले.

या सामन्यांमध्ये श्री वसंत गुळभिले, श्री कृष्णा भुमरे, श्री रघुनाथ कानडे, डॉ गोविंद कदम यांनी उत्कृष्ट स्मॅशेस लगावले तर सोपान पवार, गणेश तांदळे, गोविंद शिंदे, जयप्रकाश बिराजदार, सोमनाथ वाघमारे, योगेश पवार, नितीन काकडे व भारत सोनवणे यांनी मोलाची साथ दिली. या संघाच्या यशाबद्दल विवेकानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री अक्षयभाऊ शिसोदे, सचिव श्री. श्रीमंतराव शिसोदे, उपाध्यक्ष श्री अमरभाऊ शिसोदे, सहसचिव श्री. यशोद पाटील, कोषाध्यक्ष श्री. तुषारभाऊ शिसोदे, प्रशासकीय अधिकारी श्री प्रभाकर मोरे, प्राचार्य प्रोफेसर श्याम शिरसाट, उपप्राचार्य डॉ.दादाराव शेंगुळे व डॉ. राजेंद्र शेजुळ आणि शारीरिक शिक्षक डॉ.गोविंद कदम आदींनी अभिनंदन केले.

उपविजेता संघ :-  श्री सोपान पवार, (कर्णधार), श्री रघुनाथ कानडे, (उपकर्णधार), श्री सोमनाथ वाघमारे, श्री जयप्रकाश बिराजदार, श्री वसंत गुळभिले, श्री कृष्णा भुमरे, श्री गणेश तांदळे, श्री गोविंद शिंदे, श्री योगेश पवार, श्री नितीन काकडे, श्री संजय सानप,  श्री भारत सोनवणे  डॉ. गोविंद कदम

